# वसई-विरार शहर महानगरपालिका
## पाणीपुरवठा विभाग

---

दि.०६/०७/२०२२

## <u>प्रेसनोट</u>

वसई विरार शहर महानगरपालिकेस सूर्या, उसगाव आणि पेल्हार धरणातून पाणी पुरवठा होत आहे. सदरची धरणे ही पालघर जिल्ह्यात येत असून शासनाच्या हवामान विभागाने पालघर जिल्ह्यात दिनांक ०६/०७/२०२२ ते दिनांक ०९/०७/२०२२ पर्यंत अतिवृष्टीचा इशारा दिला असल्याने वरील तिन्ही धरणाच्या ठिकाणी पावसामुळे म.रा.वि.म. (MSEB) चा विद्युत पुरवठा खंडित होण्याची शक्यता आहे. तसेच सूर्या धरणाच्या मासवण पपिंग स्टेशन येथे अतिवृष्टीमुळे सूर्या नदीला पूर येऊन नदीतून वाहून येणारा गाळ, कचरा मासवण पंपिंग स्टेशन येथील जॅक वेल मध्ये गेल्याने पंप चोकब होत आहेत आणि चोकब काढण्यासाठी पाणबुडी उतरवून पंप साफ करावे लागत असल्याने त्या वेळेत पंप बंद करावे लागत आहेत, त्यामुळे शहरातील पाणीपुरवठ्यावर याचा परिणाम होत असून पुढील ४ दिवस अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला असल्याने शहरातील पाणीपुरवठा अनियमित व कमी प्रमाणात होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे सर्व नागरिकांनी पाणी जपून वापरावे व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

पाणीपुरवठा विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका